# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र. २८६/२०१९  दिनांक २९/०८/२०१९**

## १) मोबाईल चोरी:-

**अ)भाग्यनगर :-** दिनांक १८.०८.२०१९ रोजी चे ०६.३० ते ०८.०० वा.चे. दरम्यान, फिर्यादीचे राहातेघरी बेडरुममधुन परिमलनगर नांदेड येथे, यातील यांनी त्यांचा एम.आय. कंपणीचा मोबाईल किंमती १५,९९०/- रु चा हा त्याचे बेडरुम मध्ये चार्जींगला लावुन दार उघडे ठेवुन कामानिमीत्त बाहेर गेले असता कोणीतरी आज्ञात चोरटयांने बाहेर गेल्याच्या संधीचा फायदा घेऊन घरात प्रवेश करुन फिर्यादीचा मोबाईल चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी हणमंत बालाजी गुरव, वय ३८ वर्षे, व्यवसाय व्यापार रा. परिमलनगर, नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे भाग्यगनर** गुरनं २६६/२०१९ कलम ३७९ भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/१०७४ नरवाडे, मो.नं. ९८२३०४४७२४** हे करीत आहेत.

**ब)उस्माननगर :-** दिनांक २७.०८.२०१९ रोजी चे १५.३० सुमारास, मारतळा आठवडी बाजार सार्वजनिक रोडवर ता. लोहा जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी हा मारतळा येथील आठवडी बाजार करीत असताना कोणीतरी आज्ञात चोरटयाने फिर्यादीची नजर चुकवुन शर्टाचे वरील खिशामधील मोबाईल चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी अजीत मारोतराव गुरपल्ले, वय ४७ वर्षे, व्यवसाय नौकरी रा. हाळदा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं १०९/२०१९ कलम ३७९ भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१००५ बोईनवाड, मो.नं. ९०४९६१८७०२** हे करीत आहेत.

## २) गंभीर दुखापत :-

**इतवारा :-** दिनांक २५.०८.२०१९ रोजी चे २०.३० वा. चे सुमारास, बकरा मार्केट ईतवारा नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तुझा भाऊ फायनान्स कंपणीचे टि.व्ही. चे हाप्ते भरले नाहीत म्हणुन फिर्यादीस आरोपीतांनी काठीने, पंचने, उजव्या हातावर मारुन फॅक्टचर करुन गंभीर दु:खापत केली आहे. वगैरे **फिर्यादी मिर्झा रफिक बेग पि. मिर्झा अन्वर बेग, वय ४२ वर्षे, व्यवसाय हॉटेल रा. बकरा मार्केट ईतवारा नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे ईतवारा** गुरनं १८८/२०१९ कलम ३२५, ३४ भादंवि कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/स्वामी, मो.क्र. ९५५२७१५१०८** हे करीत आहेत.

## ३) खंडणीची मागणी :-

**वजिराबाद :-** दिनांक २४.०८.२०१९ रोजी चे २०.०० वा. चे सुमारास, कत्रुवार हॉस्पीटल नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस हमको रिंधाभाईने आपसे पैसे लेने की लिए भेजा है, पैसे दो, नही तो रिंधाबाईसे बात करो, असे म्हणुन खंडणीची मागणी केली. वगैरे **फिर्यादी डॉ. मनिष विजयकुमार कत्रुवार, वय ५० वर्षे, व्यवसाय वैद्यकिय क्षेत्र, रा. कत्रुवार हॉस्पीटल नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन २६३/२०१९ कलम ३८४, ३४ भादंवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोनि/शिवले, मो.क्र. ९८२१६९२२६१** हे करीत आहेत.

## ४) विवाहितेचा छळ करुन मरणास कारणीभुत :-

**हिमायतनगर :-** दिनांक २७.०८.२०१९ रोजी चे १७.३० ते ०३.०० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे राहाते घरी जनता कॉलनी हिमायतनगर जि.नांदेड येथे, यातील **मयत नामे मालनबाई शंकर गायकवाड, वय २५ वर्षे, रा. जनता कॉलनी हिमायतनगर जि.नांदेड** हिस यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन हुंडयाचे राहिलेले पैशाकरीता व तु दिसायला चांगली नाहीस असे बोलुन नेहमी मारहाण करत तिचा छळ केला. सदर त्रासाला कंठाळुन तिने राहते घराचे वरचे लाकडाला दोरीने गळफास घेऊन मरण पावली. वगैरे. वगैरे **फिर्यादी लक्ष्मण पि. दासु गोरे, वय २५ वर्षे, व्यवसाय मजुरी रा. मगनपुरा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं १४५/२०१९ कलम ३०४(ब), ४९८(अ), ३४ भादंवि कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/पठाण ,मो.नं. ९९२३२५७८७८** हे करीत आहेत.

## ५) विवाहितेचा छळ :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०४.११.२०१८ चे वा. १०.०० ते दि. २३.०७.२०१९ रोजी चे २१.०० वा. चे दरम्यान, कौशल्यनगर, धनेगाव नांदेड येथे, यातील फिर्यादी ही तिचे सासर घरी नांदायला असताना यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तु तुझ्या माहेरहुन दोन लाख रुपये घेऊन ये नाहीतर आम्ही तुझा संसार सुखाने होऊ देणार नाही व फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेऊन शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी मंगल सुभाष सुर्यवंशी, वय ३४ वर्षे, रा. पोखरभोसी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं.४१४/२०१९ कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादवि कायदा प्रमाणे गुन्हां दाखल असून **तपास पोना/चक्रधर , मो.क्र. ७०२०४४८४११** हे करीत आहेत.

## ६) जुगार :-

**१)नांदेड ग्रामीण :-** दिनांक २८.०८.२०१९ रोजी चे १६.३० वा. चे सुमारास, खुदबेनगर चौरस्ता मुखीद फेक्शन हॉल नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी १२३०/-रु चा मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/शेख जावेद शेख शब्बीर, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. ४१६/२०१९ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/७४१ , मो.क्रं. ७७६९९९४७७१** हे करीत आहेत.

**२)माहुर :-** दिनांक २८.०८.२०१९ रोजी चे १७.३० वा. चे सुमारास, बसस्थानक परिसर माहुर जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी १०३०/-रु चा मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/रामचंद्र नारायण दराडे, ने. पोस्टे माहुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे माहुर** गुरनं. १००/२०१९ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/घोडके, मो.क्रं. ९०४९२७२१००** हे करीत आहेत.

## ७)बेकायदेशिर गुटखा बाळगला :-

**विमानतळ :-** दिनांक २७.०८.२०१९ रोजी चे २२.४५ वा. चे सुमारास, शंकरराव चवहाण चौक ते आसना टि पाँईण्ट जाणारे रोडवर लाला पेट्रोल पंपाजवळ नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिर रित्या शासनाने प्रतिबंधीत केलेला किंमती ४९,७७,०००/-रु चा गुटखा व ट्रक क्रमांक एम.एच.-१२/एच.डी.-७५११ किंमती १०,००,०००/-रु असा एकुण ५९,७७,०००/-रु चा माल चोरटी विक्री करण्याचा उद्देशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी प्र. म. काळे, अन्न सुरक्षा अधिकारी अन्न व औषध प्रशासन (म. रा.) श्रीनगर नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं २००/२०१९ कलम १८८, २७२, २७३, ३२८, ३४ भादवी, सह कलम २६(२)(iv) २७, २३ व सह वाचन कलम ३०(२)(अ) ५९(iv) अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/मांटे , मो.नं. ७९७२२३१५१५** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४

# प्रेस नोट

## नव्यानेच रुजु झालेले पो.अ. यांची धाडसी कार्यवाही
## गोविंद कोकुलवार यांचे गुन्हयाचा कट उघडकीस,
## खंडणीचे आरोपी गजाआड करुन, 01 गावठी कटटा, 02 पिस्टल काडतुसासह केले जप्त
## (एकुण 03 गुन्हे दाखल करुन 04 आरोपी अटक केले)

नव्यानेच रुजु झालेले नांदेड पोलीस अधीक्षक मा. श्री विजयकुमार मगर यांनी व अपर पोलीस अधीक्षक श्री दत्ताराम राठोड यांनी जिल्हयातील पोलीस अधीकारी व कर्मचारी यांची तातडीने बैठक घेऊन जिल्हयातील अग्नी शस्त्र, घातक शस्त्र तलवारी व खंजर वापर करुन गंभीर गुन्हे करणारे गुन्हे व गुन्हेगारांचा आढावा घेऊन, नांदेड शहरात व परिसरात शांतता राहावी व आगामी श्रीउत्सव संबधाने गुन्हेगारा व शस्त्राची माहीती काढुन केसेस करण्याचे पोलीस अधीक्षक यांनी खंडणी विरोधी पथकाचे पो.नि. निकाळजे यांना व स्थागुशाचे पोनि देशपांडे यांना सुचना दिले.

त्यावरुन खंडणी विरोधी पथकाचे व स्थानिक गुन्हे शाखेचे व पोलीस आधीकारी व कर्मचारी यांनी जिल्हयातील गुन्हेगारांचा शोध घेऊन, पोलीस ठाणे हदगांव हद्दीत मौजे आंबाळा येथील गुन्हेगारांचे सहवासात रहाणारा आरोपी बजरंग ऊर्फ योध्दा भिमराव नरवाडे यांचेकडुन एक गावठी कटटा अग्नीशस्त्र जप्त करुन पो.स्टे. हदगांव येथे गुरनं. 148/2019 कलम 3/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीकडे अधीक विचारपुस केली असता, योध्दा नरवाडे रा. आंबाळा व कुख्यात गुन्हेगार सुभाष पवार या दोघा गुन्हेगारांची एक सामुहीक टोळी असुन, त्यांनी नांदेड जिल्हयात व ईतर महाराष्ट्राचे भागात गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले असल्याचे उघड झाले आहेत. योध्दा नरवाडे रा. आंबाळा यांचे रहाते घरी कुख्यात गुन्हेगार **गुरुचरणसिंघ ऊर्फ लक्की पिता संपुरणसिंघ गिल रा. अबचलनगर, नांदेड** व त्याचा साथीदार गुडडू ऊर्फ सय्यद नजीरोद्दीत मुनीरोद्दीन रा. आसरानगर, देगलुर नाका नांदेड यांनी पोलीस ठाणे ईतवारा नांदेड येथील गुरनं. 176/2019 कलम 307 भादंवि या गंभीर गुन्हयातील जखमी गोविंद तुळसीराम कोकुलवार रा. न्यायनगर, कवठा नांदेड यांचा खुन करण्याचा कट रचाला होता, गोविंद कोकलवार यांचा अग्नीशस्त्राने फायर करुन खुन करण्यासाठी म्हणुन पुर्वतयारी करुन, दिनांक 17.08.2019 रोजी जखमी गोविंद कोकुलवार यांचेवर अग्नीशस्त्राने फायरींग करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केले. त्या गुन्हयात लागणारे पिस्टल हे महाराष्ट्रातील कुख्यात गुन्हेगार सुभाष मोहन पवार रा. बरडशेवाळा ता. हदगांव यांनी पुरवल्याचे निष्पन्न झाले आहे. तो आरोपी सुभाष पवार हा सध्या पोलीस ठाणे हदगांव येथील खंडणीचा गुन्हा नंबर 140/2019 कलम 384, 506,34 भादंवि या गुन्हयात पोलीस कस्टडी मध्ये आहे.

तसेच लातुर जिल्हयातील गुन्हेगार विठल महादेव कुरणे रा. स्वराजनगर, बार्शी रोड, लातुर हा अवैधरित्या अग्नीशस्त्र तस्करी व विक्री करणारा गुन्हेगार असुन, तो नांदेड शहरातील लोकांना शस्त्र विक्री केल्याची खात्रीशिर माहीती मिळाल्या वरुन खंडणी विरोधी पथकाचे पो.नि. निकाळजे यांचे मार्गदर्शनानुसार सपोनि भारती यांनी त्या गुन्हेगारास ताब्यात घेऊन त्यास विश्वासात घेऊन विचारपुस केली, त्यांनी माहे डीसेंबर 2018 मध्ये दोन गावठी पिस्टल पुणे येथुन विक्रीसाठी आणलेले दोन पिस्टल पैकी एक पिस्टल मुखेड येथुन जप्त करण्यात आले असुन, सदर आरोपी विरुध्द पोस्टे मुखेड येथे गुरनं. 268/2019 कलम 3/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगीरी सपोनि भारती व त्यांचे पोलीस पथकाने केली आहे.

तसेच नांदेड जिल्हयाती मोठे व्यापारी, गुत्तेदार व व्यावसायीक लोकांना फोनवरुन धमक्या देऊन त्यांचेकडुन मोठया प्रमाणात खंडणीच्या रक्कमा वसुल करणारा राज्य पंजाब व महाराष्ट्रातील कुख्यात गुन्हेगार रिंधा ऊर्फ हारविंदरसिंघ संधु रा. नांदेड यांचे सांगणेवरुन नुकतेच दिनांक 23.08.2019 रोजी नांदेड शहरातील एका कुशल वैद्यकीय व्यवसायीक यांना रिंधा यांने अज्ञात दोन सरदारजी यांना दवाखान्यात पाठवुन 50 लाख रुपयाची खंडणीची मागणी केली होती. मा. पो.अ. नांदेड यांचे मार्गदर्शन व सुचना नुसार खंडणी विरोधी पथकाचे पोनि निकाळजे यांनी गुप्त बातमीदार व तांत्रीकरित्या माहीती काढुन गुन्हयातील दोन आरोपी 1) बलप्रितसिंघ ऊर्फ आशीष पिता नानकसिंघ सपुरे, सेवादार/पहरेदार रा. नंदीग्राम सोसायटी, हानुमान मंदीराचे मागे, नांदेड 2) कमलप्रीतसिंघ ऊर्फ कमल पिता अमरजितसिंग संधु रा. कंधारवाले यांचे घरी, अबचलनगर नांदेड यांना पोलीस ठाणे वजिराबाद नांदेड गुरनं. 263/2019 कलम 384 भादंवि या खंडणीच्या गुन्हयात अटक करुन त्यांना गजाआड केले आहे.

सदरची कामगीरी ही मा. श्री विजयकुमार मगर, पोलीस अधीक्षक, नांदेड व मा. श्री दत्ताराम राठोड, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोनि निकाळजे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि देशपांडे यांनी व त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधीकारी सपोनि भारती, सपोनि मांजरमकर, पोउपनि शेकडे, सपोउपनि खाडे, जशवंतसिंघ शाहु, रामदास श्रीमंगले पोलीस जमादार उदय राठोड, दशरथ जांबळीकर, महेश कुलकर्णी, भिमराव राठोड, पांडुरंग जिनेवाड, तानाजी येळगे, मंगेश जोंधळे, हाणमंत पोतदार, व्यंकट गंगुलवार, रविकिरण बाबर, ब्रम्हानंद लामतुरे, बजरंग बोडके, सुनिलदत्त गटलेवार, बालाप्रसाद जाधव, शैलेश बुगडलवाड, देवीदास चव्हाण, राजु पुल्लेवार, महमद आलीम, श्याम नागरगोजे, गजानन बयनवाड, महीला पोलीस फुलारी, महीला पोलीस शिपाई महेजबीन शेख या पोलीस पथकांने कामगिरी केले आहे. सदर पोलीस पथकांचे मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांनी अभिनंदन केले आहे.

**पोलीस निरीक्षक,**
**जनसंपर्क अधीकारी,**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड .**